**<u>ठळक बातम्या</u>**

- भारताचं एलपीजी वाहक जहाज ‘ग्रीन सान्वी', होर्मुझ सामुद्रधुनी पार करून मुंबईच्या दिशेने रवाना

- बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक बिनविरोध होण्यासाठी सर्व पक्षांनी सहकार्य करावं, मुख्यमंत्र्यांचं आवाहन

- विधानपरिषद निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे सांगतील त्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केलं स्पष्ट

- नाशिक जिल्ह्यात दिंडोरी इथं गाडी विहीरीत कोसळून ९ जणांचा मृत्यू/ मृतांच्या कुटुंबांना ५ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर

**आणि**

- राज्यातल्या अनेक जिल्ह्यात अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे शेतपीकांचं तसंच घरांचं मोठं नुकसान

**<><><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय जहाज ‘ग्रीन सान्वी', ४४ हजार टन एलपीजी घेऊन होर्मुझ सामुद्रधुनी पार करून मुंबईच्या दिशेने रवाना झालं आहे. इराणनं  होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अनेक निर्बंध लादले असले तरी भारतीय ध्वज असलेल्या जहाजांना सुरक्षितपणे जाण्याची परवानगी दिली आहे. युद्ध सुरू झाल्यापासून गेल्या महिन्याभरात होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणारं हे सातवं भारतीय जहाज आहे. सामुद्रधुनीच्या पश्चिमेला अडकलेल्या १७ भारतीय जहाजांपैकी, 'ग्रीन आशा' आणि 'जग विक्रम' ही दोन जहाजं देखील  एलपीजीनं भरलेली आहेत. या जहाजांना सामुद्रधुनी पार करण्याची लवकरच परवानगी मिळेल

आणि एलपीजीच्या तुटवड्याचा सामना करणाऱ्या भारतीयांना मोठा दिलासा मिळेल, असं  वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे.

**<><><><><><>**

उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे होऊ घातलेली बारामती मतदारसंघाची पोटनिवडणूक बिनविरोध होण्यासाठी सर्व पक्षांनी सहकार्य करावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. आगामी पाोटनिवडणुकीत बारामती मतदारसंघात रिक्त झालेल्या जागेवरून सुनेत्रा पवार निवडणूक लढवणार आहेत. सर्व पक्षांनी सुनेत्रा पवार यांना पाठिंबा देऊन महाराष्ट्राच्या राजकीय पंरपरेचं पालन करावं असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री पोटनिवडणूक**

माजी गृहमंत्री दिवंगत आर आर पाटील यांच्या निधनानंतर त्यांच्या मतदारसंघातून पाटील यांच्या पत्नी सुमन पाटील या बिनविरोध निवडून आल्या होत्या याची आठवणही यावेळी मुख्यमंत्र्यांनी करून दिली. येत्या २३ एप्रिलला ही निवडणूक होणार आहे.

**<><><><><><>**

वैश्विक ज्ञानाचं भारतीयीकरण आणि भारतीय ज्ञानाचं वैश्विकरण करणं, हेच नव्या शैक्षणिक धोरणाचं प्रमुख उद्दिष्ट्य आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. नागपूर मध्ये आयोजित ‘महाराष्ट्र ज्ञान सभा-२०२६’ या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनसत्रात ते आज प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.  कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात जागतिक ज्ञान आणि भारतीय ज्ञान व्यवस्थेचा मेळ साधणारी आणि जागतिक आव्हानांचा सामना करणारी शिक्षण पद्धती विकसित करावी लागेल, असंही ते म्हणाले. राज्य सरकार नवी मुंबईत विकसित करत असलेल्या एज्युसिटीमध्ये अनेक विदेशी विद्यापीठांचं शिक्षण कमी

खर्चात घेण्याची संधी मुलांना उपलब्ध होणार आहे. आपल्या विद्यापीठांनीही या स्पर्धेत उतरून शिक्षणाचा तो स्तर गाठायला हवा, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

विधानपरिषद निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे जे नाव देतील, त्याला आमचा पूर्ण पाठिंबा असेल , असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. नुकत्याच झालेल्या राज्यसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या पक्षाने शरद पवार यांना पाठिंबा दिला होता, त्यामुळे पवार यांचा राज्यसभेवर जाण्याचा मार्ग सुकर झाला. आता राज्यातील विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक होणार आहे. विधानसभेतील सध्याचं संख्याबळ पाहता महायुतीच्या वाट्याला ८ जागा, तर महाविकास आघाडीच्या वाट्याला केवळ एक जागा येण्याची शक्यता आहे. उद्धव ठाकरे यांच्या विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपत असल्याने, ते स्वतः उमेदवार असतील की अन्य कोणाला संधी देतील, याकडे सर्वांचे लक्ष लागलं आहे.

**<><><><><>**

सातारा जिल्हा परिषदेच्या विषय सामित्यांच्या सभापती निवडी आज बिनविरोध पार पडल्या. यात भाजपचे चार पैकी २ सभापती झाले. निवडीसाठी सभागृहात जाण्यापूर्वी मोबाईल बाहेर ठेवायला सांगितल्याने काळ्या फिती बांधून आलेल्या राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या सदस्यांनी पोलिसांचा निषेध करत जोरदार घोषणाबाजी करत सभात्याग केला. सभागृहात विरोधी राष्ट्रवादी आणि सेनेचे सदस्य नसल्याने या निवडी बिनविरोध झाल्या.

**<><><><><>**

एन एच ए आय म्हणजेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं महाराष्ट्रातल्या वाढवण बंदरापासून राष्ट्रीय महामार्ग ४८ वर 'तवा' या गावापर्यंत चार-पदरी द्रुतगती महामार्गाच्या बांधकामासाठीचं कंत्राट मंजुरी पत्र जारी केलं आहे. या कामासाठी २ हजार ३६० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. दिल्ली-मुंबई द्रुतगती महामार्ग आणि एनएच-४८ यांना जोडणारा हा द्रुतगती महामार्ग, वाढवण बंदराचा अंतर्गत भागाशी संपर्क वाढवेल.

**<><><><><><>**

नाशिक जिल्ह्यातल्या दिंडोरी इथं कार विहिरीत कोसळल्यानं एकाच कुटुंबातल्या ९ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये ६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. एका खासगी शिकवणी वर्गाचं स्नेहसंमेलन आटोपून हे सर्वजण निघालेले असताना मंगल कार्यालयाजवळच्या शेतातल्या विहिरीत त्यांची कार कोसळली.

आपत्कालीन व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन तसंच अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी आज घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या दुर्घटनेला कारणीभूत झालेली विहार तातडीनं बुजवण्याचे निर्देश नगरपालिकेला दिल्याचं महाजन यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना ५ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर केलं आहे. तसंच जिल्हाप्रशासनाला दुर्घटनेची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

**होल्ड बाईट-मुख्यमंत्री**

**<><><><><><>**

महाराष्ट्रातल्या नांदेड इथं आज पहाटे दोन गटात झालेल्या हिंसाचारात तीन जणांचा मृत्यू झाला. याप्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली आहे.

नांदेडमधल्या दोन गुन्हेगारी टोळ्यांमधे काही कारणाने वाद झाल्यानंतर दोन्ही बाजूंनी एकमेकांवर जंबिया आणि तीक्ष्ण हत्यारांनी वार केले गेले, यात दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर एकाला रुग्णालयात उपचारासाठी नेलं असता दुसऱ्या टोळीने हल्ला करून त्याची हत्या केल्याचं पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी सांगितलं. याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

**<><><><><><>**

गेल्या तीन दिवसांपासून राज्यातल्या अनेक जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे शेतपीकांचं तसंच घरांचं मोठं नुकसान झालं आहे. **बीड** तालुक्यातल्या ताडसोन्ना, वलीपूर, घाटजवळा, जवळा तांडा इथं काल संध्याकाळी सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. यात अनेक घरांच्या भिंती पडल्या तसंच घरावरची पत्रं उडून गेली. अनेठ ठिकाणी झाडं उन्मळून पडली तसंच शेतपिकांनाही मोठा फटका बसला आहे. सातत्याने दोन तीन दिवस पाऊस झाल्याने सिंदफणा नदीसह काही नद्या दुथडी भरून वाहू लागल्या आहेत. **जालना** जिल्ह्यातही गेल्या दोन दिवसांत वादळी वाऱ्यासह गारपीट झाली. यामुळे काढणीला आलेल्या पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. आजही जालना शहरासह जिल्ह्यात मेघगर्जनेसह पावसाला सुरुवात झाली आहे. **नंदुरबार** जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे ८३३ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचं नुकसान झालं आहे. कृषी विभागाने आतापर्यंत ६२ गावातील ९५४ शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे केले आहेत. ज्वारी, मका, बाजरी, कांदा, गहू, केळी, पपई आणि आंबा पिकाला अवकाळी पावसाचा फटका बसला  आहे. **अमरावती** जिल्ह्यात काल विजांच्या कडकडाटासह पाऊस झाला. याचा फटका गहू, मका, संत्रा पिकाला बसला आहे. **लातूर** जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे काढणीला आलेली पिकं आडवी झाली आहेत. भाजीपाला, टरबूज, खरबूज तसंच आंबा पिकालाही याचा मोठा फटका

बसला आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत जाहीर करावी अशी मागणी शेतकरी करत आहेत. वाशिम जिल्ह्यातही अवकाळी पावसामुळे कांदा आणि हळद पिकाचं नुकसान झालं आहे. **धुळे** जिल्ह्यात झालेल्या नुकसानीची पालकमंत्री जयकुमार रावल यांनी आज पाहणी केली. नुकसानीचे पंचनामे करून अहवाल सादर करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्सनं मुंबई इंडियन्सचा सहा गडी राखून पराभव केला.

**<><><><><><>**

राज्यात येत्या दोन दिवसांत मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल अशी शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><><>//**